19 MAR 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार : डॉ. अप्पासाहेब पवार

■ प्रा. डॉ. अरुण शिंदे



**डॉ. अप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठ हे आपले जीवितकार्य मानून त्याच्या उभारणीसाठी स्वतःला वाहून घेतले. बारा वर्षांच्या अथक परिश्रमाने त्यांनी एकेकाळच्या निर्जन ओसाड माळरानावर विद्यानगरी फुलविली. खऱ्या अर्थाने ते शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार आहेत.**



अप्पासाहेब पवार यांचा जन्म ५ मे १९०६ रोजी कुरुंदवाड संस्थानातील मुचंडी या गावात झाला. त्यांचे शालेय शिक्षण बेळगावजवळच्या वडगाव व शहापूर या गावी झाले. १९२४ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून ते बी. ए. झाले. प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या सहवासात त्यांची बौद्धिक घडण झाली. त्यांनी मुंबई विद्यापीठाची इतिहास व अर्थशास्त्र विषयातून एम. ए. एल. एल. बी. ची पदवी संपादन केली (१९३०) व पुढच्याच वर्षी ते एल. एल. बी. झाले. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. 'रिजन ऑफ शाहू छत्रपती १७०८-१७४९' हा साताऱ्याच्या छ. शाहू महाराजांच्या कारकिर्दीचा सखोल अभ्यास करणारा प्रबंध लंडन विद्यापीठास सादर करून त्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली (१९३४). त्यानंतर बार अ‍ॅट लॉची पदवी संपादन केली (१९३५). मायदेशी परतल्यावर त्यांची राजाराम कॉलेजमध्ये इतिहास व अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यात आली.

राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी आपल्या शैक्षणिक व संशोधनात्मक कामाचा भक्कम पाया घातला. मराठ्यांच्या इतिहासाशी निगडित हजारो कागदपत्रांचे संकलन व संशोधन केले. अभ्यासू संशोधक म्हणून त्यांचा लौकिक सर्वत्र पसरला.

डॉ. पवार यांनी राजाराम कॉलेजचे प्राचार्य (१९४५-४९), गुजरातमधील विसनगर येथील एम. एन. कॉलेजचे प्राचार्य (१९४९-५२), मुंबई राज्याचे शिक्षण उपसंचालक (१९५२-५४) माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे चेअरमन (१९५४-५८), शिक्षण सहसंचालक (१९५९), महाराष्ट्राचे शिक्षण संचालक (१९५९-६२) म्हणून काम केले. शिक्षण संचालक म्हणून त्यांनी शिक्षणप्रसाराला सर्वाधिक प्राधान्य दिले. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलतीतून मोफत शिक्षण सुरू केले. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाजाची मुले शिकली. त्यांचा कार्यकाल

## प्रेरणा आणि अस्मिता

महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील सुवर्णयुग मानला जातो.

डॉ. अप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून २० सप्टेंबर १९६२ रोजी कार्यभार स्वीकारला. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. डॉ. पवार यांनी शिवाजी विद्यापीठ हे आपले जीवितकार्य मानून त्याच्या उभारणीसाठी स्वतःला वाहून घेतले. विद्यापीठ परिसर विकास, कार्यक्षम प्रशासन, ग्रंथालय, वैशिष्ट्यपूर्ण योजना व आर्थिक सक्षमता या परिमाणांवर विद्यापीठाची भक्कम उभारणी करण्याचे काम त्यांनी केले.



विद्यापीठातील प्रत्येक वास्तूची उभारणी त्यांच्या देखरेखीखाली झाली. १९६६ मध्ये विद्यापीठाचे कार्यालय, अधिविभाग व ग्रंथालय स्वतःच्या इमारतीत सुरू झाले. मुलामुलींच्या वास्तव्याने वसतिगृहे गजबजली. विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ ६ ऑक्टोबर १९६४ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. १९७४ साली विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर छ. शिवाजी महाराजांचा १८ फूट उंचीचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला.

एक कुशल प्रशासक म्हणून त्यांनी स्वतःच्या कार्यशैलीचा अमीट ठसा उमटविला. विद्यापीठाच्या कामकाजाची शिस्तबद्ध कार्यपद्धती निर्माण केली. विद्यापीठाचे परिनियम, 'ज्ञानमेवामृतम' हे विद्यापीठाचे बोधवाक्य व बोधचिन्ह तयार केले केले. विद्यार्थी कल्याण मंडळ, विद्यार्थी भवन, कमवा आणि शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, बहिःशाल शिक्षण मंडळ, व्याख्यानमाला, ग्रंथमाला यांसारखे अनेक उपक्रम सुरू केले.

बारा वर्षांच्या अथक परिश्रमाने डॉ. पवार यांनी एकेकाळच्या निर्जन ओसाड माळरानावर विद्यानगरी फुलविली. खऱ्या अर्थाने ते शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार आहेत.

डॉ. पवार हे अव्वल दर्जाचे इतिहास संशोधक होते. मराठ्यांचा वस्तुनिष्ठ इतिहास उजेडात आणण्यासाठी त्यांनी तहहयात संशोधन केले. इंग्रजी, मराठी, कन्नड, संस्कृत, हिंदी, गुजराती, फ्रेंच या भाषा तसेच मोडी लिपीवर त्यांचे प्रभुत्व होते.

त्यांच्या संशोधनात आंतरविद्याशाखीय समग्र भान, अचूकता, व्यापकता प्रकटते. त्यांच्या निवडक शोधनिबंधांचा संग्रह 'स्टडीज इन मराठा हिस्ट्री - खंड १' प्रसिद्ध झाला आहे. त्यांनी 'ताराबाईकालीन कागदपत्रे' चार खंडांमध्ये प्रकाशित केली. जिजाबाईकालीन (१७४८-१७७३) पत्रे संपादित करून जिजाबाईंचा अज्ञात इतिहास उजेडात आणला. १९७० साली 'शाहू संशोधन केंद्रा'ची स्थापना करून 'राजर्षी शाहू पेपर्स'चे तसेच इतर ग्रंथांचे प्रकाशन केले. मराठा इतिहासाभ्यासाची मूलभूत संदर्भ साधने उजेडात आणून त्यांनी संशोधनाची दृष्टी व दिशा दिली.

डॉ. पवार २० जानेवारी १९७५ रोजी कुलगुरू पदावरून निवृत्त झाले. ३० डिसेंबर १९८१ रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांचे पुणे येथे निधन झाले. महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील एका युगाचा अंत झाला. त्यांचे जीवन म्हणजे ज्ञानपरायणता, समर्पणशीलता, संशोधनपरता व शिक्षणनिष्ठा यांची गगनाला भिडलेली गाथा आहे.

1 9 MAR 2018
तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## इस्त्रोचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ अलुरू सिलीन किरण कुमार प्रमुख पाहुणे : सोहळ्याची तयारी पूर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ आज ( ता. १९) मार्च रोजी होणार आहे. इस्त्रोचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ अलुरु सिलीन किरण कुमार हे दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावर्षी एकूण ५० हजार ४४४ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. सकाळी ११ वाजता प्रमुख पाहूणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील, तसेच प्रातिनिधिक स्वरुपात १०७ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रेही प्रदान केली जातील.

दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे अलुरु सिलीन किरण कुमार यांनी कर्नाटकचे असून जानेवारी २०१५ पासून त्यांनी इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन या संस्थेच्या चेअरमन पदाचा भार स्वीकारला. चंद्रयान मंगळयान याबरोबरच



परदेशात अनेक महत्वाच्या वैज्ञानिक साधनांचा विकास केला. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल २०१४ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले. स्पेस इलेक्ट्रो ऑप्टिकल प्रतिमा साधनांवर संशोधन कार्य केले आहे. आतापर्यंत त्यांनी अवकाश निर्मिती, साधना निर्मिती, स्टेरिओ इमॅजिन सिसीम विकास, सबमिटर, रिझॉनिशन, ऑप्टिकल इमॅजिन, या साधनांच्या विकासात सहभाग घेतला आहे.



अलुरू सिलीन किरण कुमार

शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी एकूण ५० हजार ४४४ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी २४ हजार २४५ विद्यार्थी प्रत्यक्ष पदवी घेणार आहेत. शिवाय २६ हजार १९९ विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. तर २७९ स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. यापैकी ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी प्रदान केली जाणार आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागातील विद्यार्थीनी प्रियंका पाटील यांना तर कुलपती पदक सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमधील एम. ए. संस्कृत विषयाची विद्यार्थीनी दीक्षा मोरे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. कुलगुरू अधिकार मंडळ, पाहुणे, विद्यार्थ्यी यांच्यासाठीचे गाऊन, मंडप, पदवी प्रमाणपत्र छापून तयार आहेत. पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी स्टॉल सज्ज आहेत.

### ग्रंथमहोत्सव

शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून आज (ता.१९) मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता ग्रंथ दिंडीचे आयोजन केले आहे. कमला कॉलेजमध्ये ग्रंथदिंडीचे उद्‌घाटन होणार असून, जनता बझार, राजारामपुरी, शिवाजी विद्यापीठ रोड, आईचा पुतळा, सायबर चौक मार्गे विद्यापीठातील लोककला केंद्रात सांगता होणार आहे. सकाळी ९ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी ५ वाजता लोककला केंद्रात सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

### केएमटी सुविधा

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी आज (ता. १९) मार्च केएमटी उपक्रमामार्फत विशेष बस सेवा देण्यात आली आहे. दीक्षांत समारंभासाठी शुगर मिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी ६.३० वाजल्यापासून सुरू राहणार आहे. याशिवाय बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रेल्वे फाटक येथून सकाळी ७ वाजल्यापासून प्रत्येक दहा मिनिटाला शिवाजी विद्यापीठ बससेवा सुरू राहणार आहे.

### ५० हजार ४४४ पदव्या प्रदान केल्या जाणार

| प्रत्यक्ष पदवी घेणारे स्नातक | |
|---|---|
| विद्यार्थी | ११५४२ |
| विद्यार्थिनी | १२७०३ |
| एकूण | २४२४५ |
| **पोस्टाने पदवी घेणारे स्नातक** | |
| विद्यार्थी | ११९६४ |
| विद्यार्थिनी | १४२३५ |
| एकूण | २६१९९ |

19 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अर्जुन टाकळकर



रोषणाई...

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ आज (सोमवार) होत आहे. यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या रोषणाईमुळे रविवारी सायंकाळी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीचा परिसर उजळून गेला.

# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ आज सोमवारी(ता.१९) होत आहे. विद्यापीठाच्या लोकाकला केंद्र दीक्षान्त मंडप येथे सकाळी ११ वाजता पदवीदान कार्यक्रम होणार आहे. इस्रोचे माजी अध्यक्ष प्रोफेसर ए. एस. किरणकुमार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे भूषविणार आहेत. इतिहास विभागातील एम. ए. भाग दोनमध्ये शिकणारी प्रियांका राजाराम पाटील यंदाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. कुलपती पदकासाठी सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या दीक्षा विजय मोरे हिची निवड झाली आहे.

यंदा एकूण ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये २४ हजार २४५ स्नातक प्रत्यक्ष पदवी स्वीकारणार असून २६ हजार १९९ स्नातकांना घरपोच पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहेत. यंदा पदवीप्राप्त मुलींची संख्या २६ हजार ९३८ तर मुलांची संख्या २३ हजार ५०६ इतकी आहे. विविध विषयांमध्ये संशोधन अभ्यासक्रम पूर्ण करून पीएचडी पदवी प्राप्त केलेल्या एकूण २७९ स्नातकांना दीक्षांत सोहळ्यात पीएचडीपदवी प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान, सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेज येथून दिंडीला प्रारंभ होणार आहे.



प्रो. ए. एस. किरणकुमार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 MAR 2018
सकाळ

# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## 'इस्रो'चे ए. एस. किरणकुमार यांची उपस्थिती


किरणकुमार

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त सोहळा उद्या (ता. १९) होणार आहे. विक्रम साराभाई डिस्टिंग्विश्ड 'इस्रो'चे प्रोफेसर ए. एस. किरणकुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत लोककला केंद्रात होणाऱ्या सोहळ्याची तयारी पूर्ण झाली आहे. ग्रंथदिंडी, ग्रंथ महोत्सवासह सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. पान ९ वर »

# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

» पान १ वरून

आठ दिवसांपासून विद्यापीठ प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दीक्षान्त सोहळ्याच्या तयारीसाठी कंबर कसली आहे. लोककला केंद्र व परिसरातील रंगरंगोटी, सजावट, प्रमाणपत्र वाटपाचे स्टॉल आणि ग्रंथ महोत्सावासाठीच्या मंडप उभारणीची सर्व कामे पूर्ण झाली आहेत. सकाळी साडेसात वाजता ग्रंथ दिंडीची सुरुवात कमला कॉलेज येथून होणार आहे. त्यात शहरातील विविध महाविद्यालयांत विद्यार्थी या दिंडीत सहभागी होणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या दिंडीचे उद्घाटन होईल. दिंडी राजारामपुरी मेन रोड, सायबर चौकमार्गे विद्यापीठात येणार आहे. या दिंडीचे स्वागत प्रोफेसर ए. एस. किरणकुमार यांच्या हस्ते केले जाईल. त्यानंतर लोककला केंद्रासमोरील ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन केले जाणार आहे. यात ५० हून अधिक स्टॉलचा समावेश आहे. त्यानंतर सकाळी अकरा वाजता मुख्य दीक्षान्त सोहळ्यास सुरुवात होईल. त्यात ५० हजार ४४४ पदव्यांचे वाटप स्नातकांना केले जाणार आहे.

गतवर्षी शैक्षणिक क्षेत्रासह क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्र, एनसीसी, एन. एस. एस. यामध्ये गुणवत्ता मिळविलेल्या प्रियांका पाटील यांना राष्ट्रपती सुवर्णपदक, तर साताऱ्याच्या दीक्षा मोरे यांना कुलपतीपदक किरण कुमार यांच्या हस्ते बहाल करण्यात येईल. त्यानंतर किरण कुमार हे स्नातकांना मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी पाच वाजता मुंबई व कोल्हापूर विद्यापीठाचे विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहेत. किरण कुमार यांना वाय प्लस सुरक्षा व्यवस्था असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी विद्यापीठ प्रशासनाच्या मदतीने आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. पार्किंगसाठीची स्वतंत्र व्यवस्थाही पूर्ण झाली आहे.

### विधी शाखेसाठी पारितोषिक

**नुकतेच दिवंगत झालेले ॲड. अरविंद च. शहा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यावर्षीपासून विधी शाखेत सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला चार हजार रुपयांचे ॲड. अरविंद च. शहा स्मृती पारितोषक देण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांचे चिरंजीव व प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. संतोष शहा यांनी पत्रकात म्हटले आहे.**

19 MAR 2018

लोकमत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज ५४ वा दीक्षान्त समारंभ

## ए. एस. किरणकुमार यांची प्रमुख उपस्थिती; प्रियांका पाटील, दीक्षा मोरे यांचा होणार सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ आज, सोमवारी सकाळी अकरा वाजता होणार आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये होणाऱ्या या कार्यक्रमास ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार प्रमुख उपस्थित आणि अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. या वर्षी ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जातील. यातील २४ हजार २४५ स्नातक हे प्रत्यक्षात उपस्थित राहून पदवी स्वीकारणार आहेत.

सन २०१७-१८ मध्ये कला, क्रीडा, बौद्धिक या क्षेत्रांसह एनसीसी, एनएसएस यांतील गुणवत्ताप्राप्त तसेच व्यक्तिमत्त्व, वर्तणूक व नेतृत्वगुण यांबाबतचे विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक शिरोली पुलाची (ता. हातकण्‍ंगले) येथील प्रियांका पाटील हिला, तर वाई (जि. सातारा) येथील दीक्षा मोरे हिला एम. ए. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल 'कुलपती पदक' देऊन सन्मानित केले जाणार आहे. विविध विद्याशाखांतील एकूण ४९ संशोधक विद्यार्थिनींना पीएच. डी. व एम. फिल. पदवी आणि विविध गुणवत्ताप्राप्त ३५ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत.

या समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीचे उद्घाटन सकाळी आठ वाजता कमला कॉलेज येथे कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते होईल. कमला कॉलेज, जनता बझार, राजारामपुरी, माउली चौक, सायबर चौकामार्गे विद्यापीठातील लोककला केंद्रात ग्रंथदिंडीचा समारोप होईल. सायंकाळी पाच वाजता लोककला केंद्रामध्ये मुंबई आणि शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग असलेला सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

### यावेळेत पदवीचे वितरण

विद्यापीठाच्या लोककला केंद्राच्या परिसरात आज, सोमवारी सकाळी साडेसात ते साडेदहा आणि दुपारी एक ते सायंकाळी साडेसहा या वेळेत पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे. यासाठी विद्यापीठाने विविध विद्याशाखानिहाय स्टॉलची व्यवस्था केली आहे.

### परिसर सजला

लोककला केंद्रासमोर मंडपाची उभारणी, ग्रंथमहोत्सवाच्या स्टॉलची मांडणी आणि समारंभाच्या मिरवणूक मार्गासह विद्यापीठ परिसरात विविध महाविद्यालयांच्या नावांचे लावलेले ध्वज, आदींमुळे विद्यापीठाचा परिसर सजला आहे. या समारंभासाठी विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक एक हे केवळ अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी खुले असणार आहे. उर्वरित सर्व घटकांसाठी प्रवेशद्वार क्रमांक दोन खुले राहणार आहे. दुपारी चारच्या सुमारास पावसाने हजेरी लावल्याने या तयारीच्या कामात गुंतलेल्या काही कर्मचाऱ्यांची धावपळ झाली.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी; इस्रोचे माजी अध्यक्ष ए. एस. किरण कुमार प्रमुख पाहुणे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवारी (दि.१९) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. इस्रोचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए. एस. किरण कुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावर्षीच्या दीक्षांत समारंभात विविध विद्याशाखांच्या सुमारे ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहेत.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे वाचन करतील. दीक्षांत समारंभानिमित्त सोमवारी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी, पालखी महोत्सव काढण्यात येणार असून विद्यापीठ लोककला केंद्राजवळ त्याचा समारोप होईल. त्यानंतर सकाळी ९ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. ग्रंथमहोत्सव दोन दिवस चालणार आहे. सकाळी ११ वाजता दीक्षांत समारंभ मुख्य कार्यक्रम होईल. सायंकाळी पाच वाजता विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. दीक्षांत समारंभाची प्रशासनाकडून तयारी पूर्ण झाली आहे. स्नातकांना पदवी घेण्यासाठी ८२ स्टॉल उभारण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या पोर्टलवर unishivaji.ac.in ही ऑनलाईन वेब लिंक देण्यात आली आहे.



कोल्हापूर : दीक्षांत समारंभाच्या पूर्वसंधेला विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर केलीली विद्युत रोषणाई. (छाया : तय्यब अली)

*दीक्षांत समारंभात ५० हजारांहून अधिक पदव्या प्रदान केल्या जाणार असून प्रत्यक्ष उपस्थित राहून २४ हजार २४५ विद्यार्थी पदवी घेणार आहेत. पीएच.डी. मिळवलेले विविध अभ्यासक्रमांचे २७९ स्नातक आहेत. सर्वाधिक १३३९६ पदवी इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे.*

*पदवी प्रमाणपत्रावरील कुलसचिवांची सही रद्द करावी लागल्याची चर्चा विद्यापीठात सुरू आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्या शाखेची परवानगी घेतली गेली नाही. केवळ व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली. यामुळे हजारो पदवी प्रमाणपत्राची नव्याने छपाई करण्याची वेळ विद्यापीठावर आली. याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, काही पदवी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी राहिल्याने त्यांची नव्याने छपाई केली आहे. अधिकाऱ्यांमध्ये मतभेद नाहीत.*

1 9 MAR 2018
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आज शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाचा** ५४ वा दीक्षान्त समारंभ उद्या (सोमवारी) होणार असून इस्रोचे माजी अध्यक्ष पद्मश्री प्रा. ए. एस. किरणकुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दीक्षान्त सोहळ्याला २३ हजार ५०६ पुरुष, २६ हजार ९३८ महिला स्नातकांना पदवी बहाल केली जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर उपस्थित होते. कुलगुरू शिंदे म्हणाले, विद्यापीठाचा ५४ व्या दीक्षान्त समारंभात एकूण ५० हजार ४४४ पदव्या स्नातकांना बहाल करण्यात येणार आहेत. यातील २४ हजार २४५ स्नातक या दीक्षान्त समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत.

परीक्षा नियंत्रक महेश काकडे म्हणाले, एकूण २७९ स्नातकांना पीएच.डी. पदवीने सन्मानित करण्यात येणार असून, यातील ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी बहाल करण्यात येणार आहे. या दिवशी २४ हजारांहून अधिक पदव्या वितरित करण्यात येणार असून त्याची तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

## राष्ट्रपती सुवर्णपदक, कुलपती पदक

या समारंभात विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातील एम.ए.मधील विद्यार्थिनी प्रियांका राजाराम पाटील हिला राष्ट्रपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे, तर संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल छत्रपती शिवाजी कॉलेज साताऱ्याच्या दीक्षा विजय मोरे हिला कुलपती पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

## ग्रंथमहोत्सवाचे आयोजन

या समारंभानिमित्त १९ आणि २० मार्च या कालावधीत विद्यापीठ प्रांगणात ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या ग्रंथमहोत्सवात पन्नासहून अधिक स्टॉल उभारण्यात येणार आहेत, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली.

## शिवाजी-मुंबई विद्यापीठाचे कलाकार

सोमवारी सायंकाळी विद्यार्थी विकास विभागातर्फे लोककला केंद्र येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेला कव्वालीचा संघ हे आकर्षण असून शिवाजी व मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कलाकार लोककला सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 MAR 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठाचा आज दीक्षांत

## पद्मश्री प्रा. ए. एस. किरण कुमार यांची उपस्थिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवार, दि. १९ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. या दीक्षांत समारंभासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ इस्त्रोचे माजी अध्यक्ष पद्मश्री प्रा. ए. एस. किरण कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या दीक्षांत समारंभात एकूण ५० हजार ४४४ पदव्या स्नातकांना बहाल करण्यात येणार आहेत. यातील २४ हजार २४५ स्नातक या दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत.

२७९ स्नातकांना पीएच. डी. पदवीने सन्मानित करण्यात येणार असून, यातील ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी बहाल करण्यात येणार आहे. सकाळी आठ वाजता कमला कॉलेजमधून ग्रंथदिंडीने होणार आहे. दीक्षांत समारंभाचा मुख्य सोहळा सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. सकाळी साडेसात वाजल्यापासून



साडेदहा वाजेपर्यंत आणि मुख्य सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी दीड वाजल्यापासून सायंकाळी साडेसहा वाजेपर्यंत स्नातकांना पदव्या वितरित करण्यात येणार आहेत. दीक्षांत समारंभानिमित्त दि. १९ आणि २० मार्च या कालावधीत विद्यापीठ प्रांगणात ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सायंकाळी ५ वाजता विद्यार्थ्यांच्या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहे. दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात मुंबई आणि शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे.

1 9 MAR 2018 **Times of India**

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Over 24k students to be conferred with degrees at SUK's convocation ceremony

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) will confer 24,245 degrees at its 54th convocation ceremony to be held at Lok-kala Kendra at the university campus on Monday.

An official from the university said the number of degrees that will be conferred this year is somewhere around 50,444 degrees. Out of the total degrees, 24,245 will be conferred during the convocation ceremony while 26,199 degrees will be conferred to students who cannot attend the programme via online mode. The number of degrees that getting conferred this year have risen by atleast 400 degrees, added the official.

Apart from this, as many as 279 PhD scholars too will be awarded with their degrees during the event

A S Kiran Kumar, distinguished scientist and former chairman of Indian Space Research Organisation (ISRO) will be the chief guest of the convocation ceremony.

University officials said in order to manage the crwod at examnination centre 2 in the campus, the convocation ceremony will begin at 7.30am and continue till 10.30am. It will again resume from 1pm to 6.30pm. The main event will begin at 11am at the university campus.

For the proper management of the crowd, a team of volunteers will handle the crowd of more than 30,000 people. Security arrangements have been accorded top priority. Entry will be allowed from gate number two of the University for General Public. For VIPs, the entry is from gate number one.


During the main event, Priyanka Patil, student of Department of History, SUK will be conferred with the coveted 'president's' medal for her overall excellence in sports, cultural activities, academics and community services for the academic year 2017-18. Diksha More of the Chhatrapati Shivaji College of Satara will be awarded with chancellors award for securing the highest marks in MA Sanskrit.

## DEGREES GALORE

| Faculty | No of degrees |
|---|---|
| Engg & Tech | 13,396 |
| Commerce | 11,204 |
| Science | 10,971 |
| Social science | 8,167 |
| Arts & Fine arts | 4,687 |

### Degree distribution

| | |
|---|---|
| Male | 23,506 |
| Female | 26,938 |



### Instructions

- Bring your identity card to collect the degree during the convocation ceremony
- Online degree certificates will be available on the university website
- Students can download the university application on android systems to get more details about the event
- Students can apply for any correction from the university's web portal

1 9 MAR 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवार, दि. १९ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात होत आहे. या दीक्षांत समारंभासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ इस्रोचे माजी अध्यक्ष पद्मश्री प्रा. ए. एस. किरण कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या दीक्षांत समारंभात एकूण ५० हजार ४४४ पदव्या स्नातकांना बहाल करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यामुळे विद्यापीठ परिसर उजळून निघाला आहे.

(छाया : एस. अली)

19 MAR 2018
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुलगी, वडील एकावेळी कायद्याचे पदवीधर

## आज घेणार पदवी : शिक्षकी पेशा सांभाळत वडिलांनी केला अभ्यास

कोल्हापूर, ता. १८ : शिक्षण घ्यायचे असेल, तर त्याला वयाची अट नसते, आयुष्यभर काहीही शिकता येते मग ते शैक्षणिक असो किंवा व्यावहारिक शिक्षण. तुरंबे (ता. राधानगरी) येथील प्राथमिक शिक्षक कुंडलिक पांडुरंग हातकर यांनी स्वतःच्या मुलीसोबत कायद्याची पदवी घेऊन इतरांसमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला.

सोमवारी (ता. १९) होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात श्री. हातकर यांच्यासह त्यांची कन्या स्नेहल या बापलेकींना एकाचवेळी कायद्याची पदवी प्रदान करण्यात येणार आहे. सद्यःस्थितीत आई-वडील मुलांना धाकदपटशा दाखवून किंवा समोर दुसराच 'आयडॉल' ठेवून तसेच मुलांनी करावे, अशी अपेक्षा बाळगून असतात. श्री. हातकर यांनी मात्र मुलीसोबत दुसऱ्या कॉलेजमध्ये कायद्याचा अभ्यास करून त्या क्षेत्रातील पदवीही संपादन केली. श्री. हातकर यांनी पहिल्यांदा दहावीनंतर डी. एड. केले, त्यानंतर ते कला शाखेतील पदवीधर झाले. त्यानंतर जि. प. शाळेत त्यांना प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. या नोकरीत राहून त्यांनी अनेक 'टॉपर' विद्यार्थी घडवले.

सातारा सैनिक स्कूल, जवाहर नवोदय विद्यालय यासारख्या स्पर्धा परीक्षांशिवाय प्रवेश न मिळणाऱ्या शाळांतही त्यांनी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली दिली.



स्नेहल हातकर व कुंडलिक हातकर

### 'आमचा बाप' वाक्याचा प्रभाव

'काय व्हायचे ते हू, पण त्या क्षेत्रातील 'टॉपर' हू' या ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. नरेंद्र जाधव यांच्या 'आमचा बाप' या पुस्तकातील वाक्याचा त्यांच्यावर प्रभाव झाला आणि शिक्षकाची नोकरी सांभाळत असतानाच त्यांनी चार वर्षांपासून कायद्याचा अभ्यास सुरू केला. त्याचवेळी त्यांची कन्याही कायद्याचे शिक्षण घेत होती. या वर्षी हे दोघेही या परीक्षेत चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले आणि एकाचवेळी मुलगी आणि वडील यांना पदवी घेण्याची नोंद शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात नोंद झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# सुवर्णपदकाला कष्टातून गवसणी

■ दिग्विजय कोण्णूर, सीसीआर


प्रियांका पाटील

खरं तर लग्नानंतर मुलींचं करिअर संपुष्टात येतं असं म्हटलं जातं. पण यंदा शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदक पटकावलेल्या प्रियांका पाटील यांचा प्रवास थोडा वेगळा आहे. लग्नानंतर सासरच्या पाठबळावर त्यांनी केलेले कष्ट, अभ्यासातील सातत्य, सांस्कृतिक कार्यक्रमांतील उत्साही सहभाग, विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर केलेले लेखन आणि विविध राष्ट्रीय कॅम्पमध्ये घेतलेला सहभागाच्या जोरावर त्यांनी सुवर्णपदक पटकावले. विद्यापीठात इतिहास भाग दोनच्या वर्गात शिकत असलेल्या पाटील यांनी अविरत कष्टातून सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

सक्षम 'मी'

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या प्रियांका अभ्यासाबरोबरच अन्य उपक्रमांत पहिल्यापासूनच रमतात. त्यांच्या जडण-घडणीत त्यांच्या मामी डॉ. सोनाली पाटील यांचा खूप मोठा वाटा आहे. १० वी आणि १२वीला वर्गात टॉपर तर बी.ए.बीएड् ला शिवाजी विद्यापीठातील गुणवत्ता यादीत ७ व्या आल्या. एम.ए.च्या तिन्ही सत्रात त्या प्रथम होत्या.

बी.ए.बी.एड च्या प्रथम वर्षातच त्यांनी एन.सी.सी. ला प्रवेश घेतला. एन.सी.सी. भवन येथे ३ एटीसी कॅम्प, पंजाब-हिमाचल मधला राष्ट्रीय एकात्मतेचा १५ दिवसांचा ट्रेक, एन.सी.सी. मधली सीपीएल(कॉर्पोरल) रँक, कॅडेट वेल्फेअरची शिष्यवृत्ती, बेस्ट कॅडेट झालेला गौरव हे त्यांच्या चिकाटीचं फळ होतं. एनएसएसचे विद्यापीठस्तरीय तीन कॅम्प, दोन विशेष श्रमसंस्कार शिबिरे, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर, प्रेरणा शिबिरात सहभाग, प्री-एनआरडीमध्ये निवड या गोष्टींमुळे त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये त्यांचा उत्साही सहभाग होता. त्यांनी आत्तापर्यंत ४० हून अधिक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्र आणि कार्यशाळेमध्ये सहभाग घेत शोधनिबंध सादर केले आहेत. एनएसएसच्या धारवाड येथे झालेल्या राष्ट्रीय एकात्मिक शिबिरात स्कीट या कलाप्रकारात त्यांना प्रथम क्रमांक मिळाला. शिवचरित्रावरती आधारलेल्या या स्कीटमधील त्यांची जिजाऊंवरती आधारलेली भूमिका प्रभावी ठरली. त्यांनी काही वृत्तवाहिन्यांवरच्या चर्चेतही सहभाग घेतला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये स्वयंसेवक समिती प्रमुखही होत्या. त्यांनी विविध शाळा आणि सामाजिक संस्थांना पुस्तकभेट, वृक्षारोपण, एड्स जनजागृती मोहीम, ध्वज निधी संकलन, बेटी बचाओ अभियान अशा अनेक उपक्रमांमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभाग घेतला आहे. तसेच कृष्णा, पंचगंगा घाट स्वच्छता, पर्यावरण पूरक गणेशोत्सव आणि मूर्ती विसर्जन, रेनवॉटर हार्वेस्टिंग कार्यशाळा गडकोट किल्ले स्वच्छता मोहीम या उपक्रमात त्यांचा सहभाग त्यांची पर्यावरणाविषयीची आस्था दर्शवतो.

महावीर कॉलेजमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वाला खरा आकार मिळाला. संस्थे अध्यक्ष अॅड. के. ए. कापसे, त्या त्या वेळचे प्राचार्य, शिक्षक यांचे मार्गदर्शन मिळत गेले. महावीरमध्ये तेजस्विनी युवती मंचाच्या अध्यक्षा असताना विविध कार्यक्रम राबविले. महाराष्ट्र टाइम्सच्या कॉलेज क्लब रिपोर्टर असलेल्या प्रियांका यांनी विविध विषांवर लेखन केले आहे. या सगळ्या प्रवासात त्यांना पती सुजित, आजेसासरे पांडुरंग पाटील आणि ज्येष्ठ उद्योगपती तुकाराम पाटील यांची मोलाची साथ मिळाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि. १९) सायंकाळी पाच वाजता विद्यार्थ्यांच्या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात मुंबई आणि शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा संयुक्त सहभाग असेल, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी दिली.

डॉ. गुरव म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यंदाच्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकासह राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सवात द्वितीय क्रमांक तसेच पश्चिम विभागीय युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदासह संगीत विभागातील विजेतेपद अशी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. या संघातील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक आणि त्यांच्या मार्गदर्शकांचा सत्कार करण्यासाठी गुणगौरव व सत्कार समारंभ आणि सांस्कृतिक देवाण-घेवाण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांचा एकत्रित सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे.

दीक्षांत समारंभानंतर सायंकाळी ५ ते ८ या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात विविध स्तरांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेले, पारितोषिकप्राप्त कला प्रकार सादर केले जाणार आहेत, असेही डॉ. गुरव यांनी सांगितले.

1 9 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुढील वर्षी पदवी प्रमाणपत्र मराठी भाषेतही !

## शिवाजी विद्यापीठ : अधिकार मंडळांच्या मंजुरीनंतर प्रस्ताव कुलपती कार्यालयास देणार

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १८ : मराठी भाषेच्या गौरवासाठी पुढील दीक्षान्त सोहळ्यापासून शिवाजी विद्यापीठातर्फे मराठी व इंग्रजी अशी द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना दिली जाणार आहेत. विद्यापीठाने त्याबाबतचा प्रस्ताव तयार केला असून, परीक्षा विभागाकडून तो मंजूर झाला आहे. विद्यापीठातील अधिकार मंडळांच्या मंजुरीनंतर तो कुलपती कार्यालयाकडे पाठविला जाईल.

द्विभाषिक प्रमाणपत्रे देण्यासाठी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांची समिती स्थापन केली होती.. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी व इंग्रजी भाषेतील तज्ज्ञांनी प्रमाणपत्रासाठीचा मसुदा तयार केला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे तो सादर झाला असून, मंजूरही झाला आहे.

### राज्यातील एकूण विद्यापीठे अशी

- जनरल - १० ● ॲग्रिकल्चर सायन्स - ४ ● नॅशनल लॉ - ३
- टेक्निकल - १ ● ॲनिमल अँड फिशरी सायन्स - १
- संस्कृत - १ ● हेल्थ सायन्स - १ ● वूमेन - १ ● ओपन - १

राज्यात वीस राज्य विद्यापीठांपैकी अकरा विद्यापीठे अकृषक आहेत. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम तेथे शिकवला जातो. पैकी मुंबईतील श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी, पुण्यातील सावित्रीबाई फुले, औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात द्विभाषिक प्रमाणपत्रे दिली जातात. प्रमाणपत्रावर एका बाजूला इंग्रजी, तर त्याच्या शेजारी मराठीतील मजकूर असतो.

इंग्रजी भाषा सर्वमान्य असल्याने देश-परदेशांत नोकरीच्या ठिकाणी प्रमाणपत्र उपयुक्त ठरावे, यासाठी विद्यापीठात ते इंग्रजी भाषेत छापले जाते. आता मराठी भाषिक प्रदेशात मातृभाषेचा गौरव व्हावा, या उद्देशाने ते मराठीतही छापले जाणार आहे.

**कर्नाटकातील सर्व विद्यापीठांकडून कन्नड व इंग्रजी अशी द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे दिली जातात. शिवाजी विद्यापीठसुद्धा आता मराठी व इंग्रजीत प्रमाणपत्र तयार करण्याच्या तयारीत आहे. प्रमाणपत्रावर एका बाजूला इंग्रजी व दुसऱ्या बाजूला मराठीतील मजकूर असेल.**
**-डॉ. डी. ए. देसाई**, मराठी मसुदा समिती

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अरविंद शाळीग्राम यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, "मी १९७७-७८ मध्ये पदवी प्रमाणपत्र घेतले. ते इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांतील आहे. आजही फुले विद्यापीठात दोन्ही भाषा असलेले प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना दिले जाते."

विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, "शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील नामांकित विद्यापीठ आहे. मराठी ही आपली राजभाषा असल्याने इंग्रजीसह मराठी भाषेत प्रमाणपत्र देण्याची विद्यापीठाची भूमिका स्वागतार्ह आहे."